# सेमीइंग्लिश

शालेय शिक्षण हे कमालीचे विस्कळित झाले आहे. शिक्षणात नवनवीन प्रयोग होऊन ते सबल होण्याऐवजी नवनवीन फॅडे येऊन ते गुणवत्तेच्या दृष्टीने दुर्बल मात्र होत चालले आहे. मूल्यशिक्षण, पर्यावरण, पहिलीपासून इंग्रजी, खिचडी, मुलींना हजेरीसाठी रोजचा एक रुपया ही किंवा अशीच आणखी काही फॅडे प्राथमिक शिक्षण सोसत आहे. त्यांच्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता वाढल्याचे कधी दिसून आले नाही, तिचे घसरणे चालूच आहे.

अलीकडचे नवे फॅड आहे ते 'सेमीइंग्लिश' चे ! भराभर अनेक शाळा सेमीइंग्लिशकडे वळत आहेत. आधी आठवीपासून सेमीइंग्लिश, नंतर पाचवीपासून आणि आता तर पहिलीपासून मुलांना सेमीइंग्लिशपर्याय देण्यापर्यंत हे फॅड पसरले आहे. मी तर काही शाळांतून बालवाडीपासून सेमी-इंग्लिशचे वर्ग चालू केल्याचे पाहिले आहे. इंग्रजी भाषेची एवढी गुलामी ब्रिटिश आमदानीत ही आपल्या देशात नव्हती!

सेमीइंग्लिश ही विद्यार्थ्यांची आणि पालकांची घोर फसवणूक आहे. मराठी शाळांमधील मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे वळू नयेत म्हणून त्यांना दाखविलेले हे गाजर आहे. मुख्य म्हणजे पालकांना असे वाटते आहे की आपल्या मुलांना चांगले इंग्रजी यावे. पण जसे पाचवी ऐवजी पहिलीपासून इंग्रजी विषय सक्तीचा केल्यामुळे मुलांना इंग्रजी आले नाही तसेच सेमीइंग्रजी म्हणजे गणित व विज्ञान हे विषय इंग्रजीतून शिकविण्याचा घाट घातल्यामुळेही ते येणार नाही. कारण, हे दोन्ही विषय बरेचसे तांत्रिक स्वरूपाचे आहेत, त्यातील संज्ञा इंग्रजीतून माहीत होणे वेगळे आणि इंग्रजी भाषा म्हणून येणे वेगळे. (या ऐवजी वर्णनात्मक स्वरूपाचे इतिहास-भूगोल हे विषय इंग्लिशमधून शिकविल्यास जरा तरी इंग्लिश येईल !) शिवाय हे विषय शिकविणारे, सेमीइंग्लिश शाळांतील शेकडो शिक्षक एकदम इंग्रजीभाषेत तरबेज कसे होतील ? त्यामुळे बहुतेक ठिकाणी मराठीतूनच सेमीइंग्लिशचे वर्ग चालविले जातात. हा तर चक्क खोटेपणाच आहे.

अनेक शाळांमध्ये चौकशी केली असता, दोन गोष्टी कळल्या. एक म्हणजे पुढे ११ वी, १२ वी मध्ये मुलांना हे विषय इंग्लिशमधून कठीण जातात म्हणून ते आधीपासून इंग्लिशमधून शिकवले तर बरे पण हे समर्थन चुकीचे आहे. म्हणजे ज्याचा बोजा वयाच्या १६-१७ व्या वर्षी पेलत नाही तो ६ व्या ७ व्या वर्षी विद्यार्थ्यांवर देणे ही केवढी विद्यार्थ्यांची पिळवणूक आहे. हे दोन्ही विषय मराठी चांगले येऊनही मराठीतूनही मुलांना कठीण वाटतात तर ते आपल्याला न येणाऱ्या इंग्रजीतून किती कठीण जात असतील ? हे विषय नेहमीच कठीण जातात ते इंग्रजीतून न शिकल्यामुळे नाही तर ते चुकीच्या पद्धतीने शिकविले जातात म्हणून.

दुसरे असे की, काही शाळांतून काही वर्ग सेमीइंग्लिशचे असतात, व त्यात निवडक हुशार मुले घेतली जातात. केवढी गफलतीची गोष्ट आहे ही. एक म्हणजे, शाळेतल्या मार्कांवरून हुशारी ठरविणे योग्य नाही, दुसरे म्हणजे, सेमीइंग्लिशसाठी निवडलेली मुले 'हुशार' आहेत असा त्यांच्यावर शिक्का मारणे, आणि त्याहूनही जी या

पर्यायासाठी निवडली नाहीत ती हुशार नसल्याचा शिक्का त्यांच्यावर शिक्का मारणे हे शाळांचे अशोभनीय व अन्यायकारक कृत्य आहे. तिसरे म्हणजे, सेमीइंग्लिशचे विद्यार्थी हे पुढे शास्त्र शाखेकडेच वळणार आहेत हे त्यांच्या लहान वयांत शाळेने ठरवून देणे हे तर धाष्टाचे नि धोक्याचेच आहे.

मी तर अशीही एक शाळा पाहिली आहे की तेथे एक तुकडी सेमीइंग्लिशची करून त्या तुकडीतील सर्व मुलांना टाय व बूट सक्तीचे केले आहेत. टाय या निरर्थक नि अनारोग्यकारक वस्तूचे स्तोम माजवून शाळेत विषमतेचे बीज मुलांच्या मनांत पेरण्याचे केवढे पाप शाळाचालक करीत आहेत!

शहाण्या पालकांनी आणि विद्यार्थ्यांच्या हिताची काळजी असणाऱ्या शाळांनी हे फॅड तात्काल बंद करावे. खरे तर, मुलांनी मराठीतून सर्व विषय शिकून ज्ञानसंपन्न व्हावे आणि इंग्रजीही उत्तम आत्मसात करावे. पण, हे होण्याचे मार्ग वेगळे आहेत. शाळांनी त्यांचा शोध घ्यावा. पण, सेमीइंग्लिशमधून होणारी विद्यार्थी - पालकांची फसवणूक थांबवावी.

❖